MHJN030008532019

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०६ | ०३ | २०१९ |
| नोंदणी दिनांक | : | ०६ | ०३ | २०१९ |
| निकाल दिनांक | : | ०२ | ०५ | २०२६ |
| कालावधी | : | ०७<br>वर्षे | ०१<br>महिने | २७<br>दिवस |

## मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी– सि. म. पाडोळीकर)

**नियमित फौजदारी खटला क्र.१६३/२०१९** **निशाणी क्र.४५**

(प्रथम खबर अहवाल क्रमांक –३६१/२०१८)
(अपराध कलम — भा.दं.वि चे कलम ३२४, ३२३,
व ५०६ प्रमाणे शिक्षेस पात्र,
पोलिस ठाणे – चंदनझीरा)

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलिस ठाणे अंमलदार,
चंदनझीरा, ता. जि. जालना. **.. अभियोगपक्ष**

विरुध्द

प्रभाकर अंबादास कोलते,
वयः ४४ वर्षे,
रा. नुतनवाडी, ता.जि.जालना. **.. आरोपी**

सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. डी. राठोड.
आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. आर. के. पातेकर.

| | |
|---|---|
| अपराध दिनांक | २३.१०.२०१८ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ३१.१०.२०१८ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दिनांक | ०६.०३.२०१९ |
| दोषारोप ठेवल्याची दिनांक | २७.०१.२०२० |
| पुरावा आरंभ झाल्याची दिनांक | २७.०१.२०२० |
| न्यायनिर्णयाची राखीव दिनांक | --------- |
| न्यायनिर्णय दिनांक | ०२.०५.२०२६ |
| शिक्षा लादलेली असल्यास दिनांक | निरंक. |

आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष किंवा दोषी | लादलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रभाकर | ०७.०१.२०१९ | ०७.०१.२०१९ | भा.दं.वि चे कलम ३२४, ३२३ व ५०६ प्रमाणे | निर्दोष | निरंक | -- |

अ. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी :-

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| अ.सा.-१ | विशाल कमलाकर लहाने (नि.क्र.२०) | फिर्यादी |
| अ.सा.-२ | रतन भिकाजी डोळसे (नि.क्र.२५) | पंच साक्षीदार |
| अ.सा.-३ | शिवाजी साहेबराव शिंदे (नि.क्र.३३) | पंच साक्षीदार |
| अ.सा.-४ | डॉ. सर्वेश महेश पाटील (नि.क्र.३८) | वैद्यकीय अधिकारी |
| अ.सा.-५ | रमेश रामचंद्र जोशी (नि.क्र.४०) | तपास अधिकारी |

ब. आरोपीच्या साक्षीदारांची यादी :-

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

मुख्य न्यायदंडाधिकारी,
दि. ०२.०५.२०२६

क. न्यायालयीन साक्षीदार :–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

निशाणी क्रमांकाची यादी :–

अ. अभियोगपक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | २१ | फिर्याद |
| २ | ३९ | वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ३ | ४१ | घटनास्थळ पंचनामा |
| ४ | ४२ | जप्ती पंचनामा |

ब. बचावपक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

क. न्यायालयीन निशाणी :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | ११ | दोषारोप |

ड. मुद्देमाल :

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| – | – | एक लोखंडी रॉड (गज). |

मुख्य न्यायदंडाधिकारी,
दि. ०२.०५.२०२६

# न्यायनिर्णय

(पारीत दिनांक ०२.०५.२०२६)

०१. आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कायदा कलम ३२४, ३२३ व ५०६ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

०२. थोडक्यात अभियोगपक्षाची हकीकत अशी की, दि.२३.१०.२०१८ रोजी २०.३० ते २१.०० वाजेच्या दरम्यान फिर्यादी तिरंगा ढाबा राजुर रोड येथे वडिल नामे कमलाकर लांडगे यांना हॉटेलवर भेटण्यासाठी गेले होते. तिरंगा ढाब्याच्या अलीकडे त्यांच्या मोटारसायकलच्या समोर प्रभु कोलते हे मोटार सायकलवरुन कानाला फोन लावुन बोलत होते व त्यांची मोटारसायकल चालु होती. तेवढयामध्ये राजुर कडुन जालन्याकडे एक ट्रक येत होता त्यामुळे प्रभु कोलते यांनी मोटार सायकलला अचानक ब्रेक लावुन रोडच्या कडेला मोटारसायकल उभी केली. त्यांच्या मोटारसायकलला ओव्हरटेक करुन फिर्यादी त्यांच्या मोटार सायकलच्या पुढे थांबला व म्हणाला की, फोन आल्यावर गाडी साईडला घेऊन गाडी थांबवुन मोबाईलवर बोलत जा. त्यावर प्रभु कोलते फिर्यादीला म्हणाला की, मला सांगणारा तु कोण यावर त्याची व फिर्यादीची बोलाचाली होऊन त्याने फिर्यादीच्या तोंडात मारली. फिर्यादी प्रभु कोलते यांना मला कशाला मारले असे म्हणाला असता त्याने फिर्यादीच्या मोटारसायकलची चावी काढुन घेतली व हातातील रॉडने फिर्यादीच्या डोक्यात मारुन फिर्यादीचे डोके फोडुन जखमी

केले. प्रभु कोलते याने फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने औषधोपचार घेऊन फिर्याद दाखल केली.

०३. सदर फिर्यादीवरुन पोलीस ठाणे अंमलदार चंदनझीरा यांनी गुन्हा क्रमांक ३६१/२०१८ नोंदविला व गुन्हयाचा तपास ए. एस. आय. श्री. आर. आर. जोशी यांना दिला. त्यांनी तपासादरम्यान घटनास्थळाला भेट देऊन दोन पंचासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवुन आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र न्यायप्रविष्ट केले.

०४. माझे पुर्व पीठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द नि.क्र.११ अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३ व ५०६ अन्वये दोषारोप निश्चीत केले. सदर दोषारोप आरोपीला वाचुन व समजावुन सांगितले असता आरोपीने गुन्हा अमान्य करुन संपरिक्षा करण्याची विनंती केली.

०५. सदरील प्रकरणाच्या योग्य निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी खालील मुद्दे विचारात निघतात व खालील नमुद कारणांसहित निष्कर्ष नोंदविले आहेत–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने फिर्यादीस लोखंडी रॉडने डोक्यावर मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत केली? | : | नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने फिर्यादीला चापटबुक्क्यांनी मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत केली? | : | नाही. |
| ०३. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारी पात्र धाकदपटशा केला? | : | नाही. |
| ०४. | आदेश कोणता ? | : | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## कारणमिमांसा

०६. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे एकुण पाच साक्षीदार तपासण्यात आले. निशाणी क्रमांक १ वरील आदेशानुसार अभियोग पक्षाच्या पुराव्याची बाजु बंद करण्यात आली. आरोपीविरुध्द पुरावा मिळुन आल्याने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नि.क्र.४४ वर नोंदविण्यात आला असता खोटी केस केल्याचा बचाव आरोपीने घेतला आहे.

०७. सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. डी. राठोड व आरोपीचे विधिज्ञ श्री. आर. के. पातेकर यांचा युक्तिवाद ऐकला.

## मुद्दा क्र.१ ते ४:

०८. मुद्दा क्रमांक १ ते ३ एकमेकांशी संलग्न व मिळते जुळते असल्यामुळे व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रित चर्चेस विचाराधिन घेण्यात येत आहेत.

फिर्यादी यांनी अशी साक्ष दिली की, घटनेदिवशी ते वडिलांना घेण्यासाठी जात असतांना समोरुन एक ट्रक येत होता त्यामुळे ते एका बाजुने मोटारसायकलवरुन जात होते. त्यावेळी आरोपी फोनवर बोलत जात असतांना त्याने अचानक ब्रेक दाबला. त्यामुळे फिर्यादीच्या मोटारसायकलची धडक होता होता वाचली. त्यांनी आरोपीला गाडी साईडला लावुन फोनवर बोलत जा असे म्हणल्यावर आरोपीने चापट मारुन फिर्यादीच्या गाडीची चावी काढुन घेतली व फिर्यादीला रॉडने डोक्यात मारुन जखमी केले. त्यानंतर ते पोलीस ठाणे येथे गेले असता पोलीसांनी त्यांना दवाखान्यात पाठविले व उपचारानंतर फिर्याद नि.क्र.२१ दाखल केली. आरोपीने रॉडने मारहाण केल्याचे फिर्यादीने कथन केले असले तरीही ज्या रॉडने मारहाण झाली तो ओळखता येणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

०९. आरोपीने लोखंडी रॉडने मारहाण केल्यामुळे डोक्याला जखम होऊन टाके पडले असे फिर्यादीने सांगितले असले तरीही वैद्यकीय अधिकारी यांच्या साक्षीप्रमाणे आरोपीच्या डोक्याला साध्या स्वरुपाची जखम झाली होती. सदरची जखम लोखंडी रॉडने होऊ शकते असेही डॉक्टरांनी सांगितले. फिर्यादीच्या डोक्याला टाके पडले असे डॉक्टरांच्या साक्षीवरुन दिसुन येत नाही. उलट फिर्यादीला झालेली जखम ही साध्या स्वरुपाची असल्याचे दिसुन येते. सबब तोंडी पुरावा व वैद्यकीय पुरावा यामध्ये तफावत असल्याचे दिसुन येते. फिर्यादीच्या कथनाप्रमाणे विकास भोसले याने फिर्यादीला पोलीस ठाणे येथे नेले परंतु अभियोगपक्षातर्फे त्यांना तपासण्यात आले नाही. आरोपीने फिर्यादीला रॉडने मारहाण केली या फिर्यादीच्या कथनास पुष्टी देणारा कोणताही पुरावा

अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच फिर्यादीची साक्ष व वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष यामध्येही तफावत असल्याने अभियोगपक्षाच्या कथनावर विश्वास ठेवणे योग्य होणार नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादीस लोखंडी रॉडने मारहाण केली तसेच धमकी दिली हे सिध्द होत नाही.

१०. तपासी अंमलदार यांच्या साक्षीप्रमाणे त्यांनी पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. तसेच आरोपीच्या ताब्यातुन लोखंडी रॉड जप्त करुन दोषारोपपत्र दाखल केले. परंतु पंच साक्षीदारांनी त्यांच्या समक्ष जप्ती व घटनास्थळ पंचनामा केल्याचे नाकारले आहे. त्यामुळे फक्त तपासी अंमलदार यांच्या साक्षीवरुन घटनास्थळ व जप्ती सिध्द झाली असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे तपासी अंमलदार यांच्या साक्षीप्रमाणे आरोपीच्या ताब्यातुन लोखंडी रॉड जप्त केला. जप्ती पंचनामा नि.क्र.४२ चे अवलोकन करता त्यामध्ये असे नमुद आहे की, आरोपीने लोखंडी रॉड पोलीस ठाणे येथे हजर केला परंतु सदरची बाब विश्वसनीय वाटत नाही. तसेच वर उल्लेख केल्याप्रमाणे फिर्यादीने जप्त रॉड तोच असल्याचे ओळखले नाही. यावरुन देखिल जप्त रॉड गुन्हयात वापरलेला आहे व तो आरोपीच्या ताब्यातुन जप्त केला असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.

११. उपलब्ध पुराव्यावरुन आरोपीने फिर्यादीस लोखंडी रॉडने डोक्यावर मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत केल्याचे तसेच चापटबुक्क्यांनी मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याचे सिध्द होत नाही. सबब आरोपीवरील गुन्हा सिध्द होत नसल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे

उत्तर नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## आदेश

०१. आरोपी प्रभाकर अंबादास कोलते यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) नुसार भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३ व ५०६ चे गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

०२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

०३. जप्त मुद्देमाल एक लोखंडी रॉड (गज) अपिल कालावधीनंतर नियमानुसार नष्ट करण्यात यावा.

०४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रक्कम ₹१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व जामीन बंधपत्र सादर करावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायदानकक्षात घोषित करण्यात आला.

SEEMA MAHADEVRAO PADOLIKAR

Digitally signed by SEEMA MAHADEVRAO PADOLIKAR
Date: 2026.05.02 16:05:35 +0530

(सि. म. पाडोळीकर)
दिनांकः ०२.०५.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी,
जालना.

<u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर निवेदन करतो की, सदर पी. डी. एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :– यशवंत दा. वाघ
न्यायालयाचे नाव :– मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, जालना
पी.डी.एफ.दिनांक :– ०२.०५.२०२६

स्वाक्षरीत/-
लघुलेखक

मुख्य न्यायदंडाधिकारी,
दि. ०२.०५.२०२६